# उपविभागीय दंडाधिकारी चाळीसगांव भाग यांचे कार्यालय चाळीसगांव

दि.15 /04/2020

क्र/दंडप्र/कावि/34 /4/2020

**वाचले** :- 1) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005
2) भारतीय साथ रोग नियत्रण अधिनियम 1897
3) मा. जिल्हादंडधिकारी जळगांव यांचे कडील आदेश क्र.दंडप्र-01/कावि/2020/49 दि. 21/03/2020
4) मा. जिल्हादंडधिकारी जळगांव यांचे कडील आदेश क्र.दंडप्र-01/कावि/2020/64 दि. 25/03/2020

-0-0-0-0-0-0-0-

**आदेश,**

कोरोणा विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखणेकामी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन त्यातील खंड 2,3,4 मधील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे. सदर विषाणुचा संसर्ग रोखण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी ,जागतीग आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषित केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात,महाराष्ट्रात गतीने पसरत आहे.असे दिसुन येत आहे.यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊन न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी ,कोव्हिड-19 विषाणूमुळे बाधित झालेल्या रुगणांवर उपचार व देखभाल करण्याकरिता स्वतंत्र व्यवस्था करणे अत्यावश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी, **लक्ष्मीकांत साताळकर, उपविभागीय दंडाधिकारी, तथा अध्यक्ष उपविभागीय समिती चाळीसगाव भाग चाळीसगांव** मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन कोराना ( कोव्हिड-19) चे बाधित व्यक्तींची संख्या वाढण्याची शक्यता लक्षात घेता कोरोना विषाणू ( कोव्हिड-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना भाग म्हणुन " **किसान ज्ञानोदय मंडळ गुढे संचलीत आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालय चाळीसगाव तसेच सामाजिक न्याय विभागाचे मुलींचे शासकीय वस्तीगृह चाळीसगांव हे वैद्यकीय उपचारांकरीता अत्यावश्यक बाब म्हणून विशेष कोव्हिड-19 रुग्णालय म्हणून घोषित करीत आहे तसेच पुढील आदेश होई पावेतो अधिग्रहीत करण्यात येत आहे "**

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,1897 नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 15/ 04/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

स्वाक्षरी/-
**(लक्ष्मीकांत साताळकर )**
**उपविभागीय दंडाधिकारी, चाळीसगाव**

**प्रत** :- मा. जिल्हादंडधिकारी जळगांव यांना माहीतीस्तव सविनय सादर
**प्रत** :- मा.जिल्हा शल्य चिकीत्सक,जळगांव यांना माहीतीस्तव कार्यवाहीसाठी
**प्रत** :- उपविभागीय पोलीस अधिकारी, चाळीसगाव भाग यांना माहितीस्तव रवाना
**प्रत** :- किसान ज्ञानोदय मंडळ गुढे संचलीत आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालय चाळीसगाव,यांना माहिती व कार्यवाहीस्तव रवाना
**प्रत** :- अधिक्षक,सामाजिक न्याय विभागाचे मुलींचे शासकीय वस्तीगृह चाळीसगांव.यांना माहिती व कार्यवाहीस्तव रवाना

**(लक्ष्मीकांत साताळकर )**
**उपविभागीय दंडाधिकारी,चाळीसगाव**